**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३००६ दि. १७/०९/२०१९**

## प्रेस नोट दिनांक - १७/०९/२०१९

## लष्कर कोर्टाकडील नॉन बेलेबल वॉरंटमधील आरोपीस युनिट १, गुन्हे शाखाच्या टिमने केली अटक.

---

आज रोजी युनिट – १ गुन्हे शाखे कडिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरूण वायकर, यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी यश बोराटे, पो.हवा. अशोक माने, पो.हवा. प्रकाश लोखंडे, पो हवा संजय बरखडे, पो.शि. गजानन सोनुने असे समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना जुंटाडया मारूती जवळ, के ई एम हॉस्पिटल पुणे येथे आलो असता पो.शि. गजानन सोनुने यांना त्यांचे बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, लष्कर न्यायालय पुणे कडिल आर सी सी नं २३९/२००२ मधील एन बी डब्लु वारंट मधील पाहीजे असलेला आरोपी नामे – दिपक परीमल गोरखा, वय ३४ वर्षे, रा.शेवकर वस्ती सोलापुर रोड पुणे सदर ठिकाणी थांबलेला असल्याची माहीती मिळालेने त्यास वरील स्टाफसह तात्काळ ताब्यात खात्री करून ताब्यात घेण्यात आले.

त्यास विश्वासात घेवून त्याचे विरुध्द दाखल असलेल्या वानवडी पोलीस स्टेशन येथील दाखल असलेल्या सन २००२ च्या घातकशस्त्र जवळ बाळगणे या गुन्हयामध्ये तो मा. न्यायालयामध्ये हजर रहात नसलेने त्याचे विरूध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, लष्कर न्यायालय पुणे कडिल आर सी सी नं २३९/२००२ आर्म अॅक्ट क ४ (२५) म पो का क ३७(१) सह १३५ मधील एन बी डब्लु वारंट बजावणीकामी असल्याची खात्री झालेने त्याची वैदयकीय तपासणी करण्यात आली असुन त्यास पुढील योग्य त्या कारवाई करीता वानवडी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बच्चन सिंग, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, डॉ. श्री. शिवाजी पवार, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो. उपनिरी यश बोराटे, पो उप निरी लहु सातपुते, पो उप निरी हनुमंत शिंदे, पो.हवा. अशोक माने, पो.हवा. प्रकाश लोखंडे, पो हवा संजय बरखडे, पो.शि. गजानन सोनुने, सपोफौज. हनिफ शेख, पो.हवा. योगेश जगताप, सुभाष पिंगळे, वैभव स्वामी, तुषार खडके, इरफान मोमिन, सुधाकर माने तुषार माळवदकर यांनी केली आहे.